ARÓGYADARPAN
Punekar's health now a click away
॥ आरोग्यम् धनसंपदा ॥



**Dr. Ashish Davalbhakta**
**M.B.B.S, MS Gen. Surgery, MCh (Plastic Surgery), FRCS (Glasgow)**
**Phone : 9881311122**
**E-mail ID : ashish@aestheticsindia.org**

# सौंदर्य शस्त्रक्रियाः शरीर सुडौल बनविण्यासाठीच्या उपचारपद्धती

आजकालच्या धावपळीच्या युगात 'आपण कसे दिसतो' याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. व्यक्तीचे दिसणे प्रथमदर्शनी खूप मोठी छाप पाडू शकते. या प्रथमदर्शनी दिसण्याचे नाती जोडण्यात किंवा तुटण्यात, नोकरी मिळवण्यात फार मोठे योगदान असते.

आपण सुंदर, आकर्षक,तरूण,तजेलदार दिसावं अशी प्रत्येकाचीच इच्छा आणि स्वप्न असतं. तुमच्या आरशातल्या आकर्षक रुपाने तुमच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. परदेशात सौंदर्यवृद्धीसाठी सौंदर्यप्रसाधनांपासून क्रिम वापरण्याकडे तसेच औषधे घेण्यापासून शस्त्रक्रिया करण्याकडे लोकांचा कल वाढत चालला आहे. सौंदर्यशास्त्राला अमेरिका व युरोपमध्ये अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

## सौंदर्यवृद्धी शस्त्रक्रियांची व्याप्ती

साधारणतः दोन कारणांसाठी सौदर्यसंबंधी प्लास्टिक सर्जरी केली जाते.

१.शरीर अधिक सुडौल बनवण्यासाठी (शरीराला योग्य आकार देण्यासाठी)
२.अधिकाधिक तरुण, चैतन्यमय,ताजेतवाने दिसण्यासाठी.

परदेशामध्ये शरीराला योग्य आकार देण्यासाठी (शरीर सुडौल बनवण्यासाठी) सर्वसाधारणपणे 'लिपोसक्शन' (Liposuction) या शस्त्रक्रियेचा वापर केला जातो. याचबरोबर नाकाचा आकार बदलण्यासाठी राहीनोप्लास्टी (Rahinoplasty), हनुवटी व गाल यांचे augmentation, स्तनांचा आकार वाढवणे किंवा कमी करणे, पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ॲबडॉमीनोप्लास्टी(Abdominoplasty), काल्फ (पोटरी) व ग्लॉटल ऑगमेन्टेशन (Calf and Gluteal Augmentation) या सारख्या अवयवांना आकार देण्यासाठीच्या (reshaping) प्रसिद्ध शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत.

ब-याचदा भरपूर प्रमाणात वजन कमी झाल्यावर दंडाची (बाहूंची), मांडयांची व उदराची त्वचा घटट करणे गरजेचे ठरते.यासाठी देखील शस्त्रक्रियेचा वापर केला जाऊ शकतो.

ओठांच्या आकार वृद्धीसाठी हायल्युरॉनिक ॲसिडचा (Hyluronic Acid) व ओठांमधील पोकळी कमी करण्यासाठी फॅट इंजेक्शनचा (Fat Injection) वापर केला जाऊ शकतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*

*© Arogyadarpan.com*

अधिक तरुण दिसण्यासाठीच्या शस्त्रक्रियांमध्ये भुवया उचलणे (Bowlift), चेहेरा (Face lift) व नेक लिफ्ट (Neck Lift) व ब्रेस्ट लिफ्ट (Brest Lift) या शस्त्रक्रियांचा समावेश होतो. चेहेऱ्यावरील सुरकुत्या व आठया शस्त्रक्रियेशिवाय घालवण्यासाठी बोटॉक्स (Botox), रेस्टीलेन (Restylane) व तत्सम हायल्यरॉनिक ॲसिड यांसारख्या इंजेक्शनचा वापर केला जातो. छोटया सुरकुत्या तसेच उन्हामुळे निस्तेज झालेली त्वचा सुधारण्यासाठी चेहेऱ्यासाठीच्या गोळया (Facial Peels), ग्लायकोलिक ॲसिड (glycolic acid) व TCA यांचा वापर केला जातो.

**<u>लिपोसक्शन (Liposuction)</u>**



लिपोसक्शन या प्रक्रियेमध्ये शोषक यंत्राच्या (Suction device)जोडीला असलेल्या एका नळीद्वारे (cannula)त्वचेखालील मेद साठयास कारणीभूत असलेल्या पेशी (Fat cells) शोषून घेतल्या जातात. या शोषून घेतलेल्या तसेच प्रक्रियेदरम्यान नष्ट झालेल्या पेशींचा कायमस्वरुपी ऱ्हास होतो. व्यायामाने किंवा आहारनियंत्रणाने कमी न होणाऱ्या मेदापासून मुक्त होण्यासाठी हा एक त्वरीत, सोपा आणि खात्रीशीर पर्याय होऊ शकतो. ओटीपोट,नितंब,बगल,मांडया इत्यादी भागांवरील मेदसाठा (चरबी) कमी करण्यासाठी लिपोसक्शन ही उपचारपद्धती अत्यंत प्रभावी ठरते. नव्याने विकसित झालेले पॉवर असिस्टेड लिपोसक्शन (Power Assisted Liposuction) ज्यामध्ये सुपर वेट इनफिल्टेरेशनद्वारे (Super wet infiltration) शरीरबांधा सुडौल करता येतो.

ही उपचारपद्धती थोडया प्रमाणात किंवा संपूर्ण भूल देऊन करण्यात येते. किरकोळ कारणांसाठी केलेल्या लिपोसक्शन उपचारपद्धतीनंतर रुग्णाला लगेच घरी सोडण्यात येते परंतु मोठया प्रमाणावरील लिपोसक्शन उपचारद्धती नंतर मात्र एक किंवा दोन दिवस रुग्णालयातच रहाणे हितावह ठरते. या शस्त्रक्रियेनंतर सूज येण्याची आणि जखमा होण्याची शक्यता असते. ही सूज व जखमा ३-६ आठवडयानंतर कमी होते.




ही उपचारपद्धती तज्ञ - अनुभवी सौंदर्यतज्ञाकडून (Aesthetic plastic surgeon) घेणे बऱ्यापैकी सुरक्षित असते. संपूर्ण भूल दिल्याने काही धोके उद्‌भवू शकतात. वाढत्या वयोमानामुळे तसेच अधिक वेळ एका स्थितीत झोपल्यामुळे पायाच्या शिरेमध्ये रक्त साकाळण्याचा (thrombasis of leg veins) धोका उद्‌भवू शकतो. हे सर्व टाळण्यासाठी पुरेशी काळजी घेणे गरजेचे ठरते. त्वचेवर रेषांची जाळी (contor irregularity)निर्माण होण्याचा पण संभव असतो. पण फॅट इंजेक्शन घेऊन किंवा पुन्हा लिपोसक्शन उपचारपद्धती घेऊन हा बिघाड दुरुस्त करता येतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
*© Arogyadarpan.com*

## ॲबडॉमीनोप्लास्टी (Abdominoplasty)



या शस्त्रक्रियेचा वापर उदरावरील अतिरिक्त चरबी व वळया काढण्यासाठी केला जातो. उदरावर जर चरबीबरोबर अतिरीक्त त्वचा देखील असेल व जी लिपोसक्शनद्वारे कमी होऊ शकत नसेल तर ही शस्त्रक्रिया करुन घेण्याचा सल्ला दिला जातो.

बऱ्याचशा स्त्रियांच्या ओटीपोटावर त्वचेची वळी निर्माण होते. तसेच या स्त्रियांमध्ये सीझेरीयन शस्त्रक्रिया झाल्यानंतर उदराचे स्नायू कमजोर होतात. त्यामुळे नाभीच्या खालील भाग पुढे आलेला दिसून येतो. यामुळे शरीराची ठेवण बिघडू शकते त्याचप्रमाणे थोडया प्रमाणात पाठ दुखीचा त्रास होण्याचाही धोका संभवतो. हे सर्व ॲबडॉमीनोप्लास्टी या शस्त्रक्रियेद्वारे टाळता येऊ शकते.

याचबरोबर एका विशिष्ट उपचारप्रक्रियेद्वारे (correction of divarication of rectil) उदराचे स्नायू घट्ट करता येतात. या प्रकारची शस्त्रक्रिया (त्वचेवर) छोटासा छेद देऊन करण्यात येते. ही जखम लवकर सुकुन चांगली बरी होते. फूल ॲबडॉमीनोप्लास्टीमध्ये (full Abdominoplasty) नाभीचे resitation केले जाते तर मिनी ॲबडॉमीनोप्लास्टीमध्ये (Mini Abdominoplasty) फक्त ओटीपोटावरची अतिरिक्त त्वचा काढली जाते.

नव्याने विकसित झालेल्या तंत्रज्ञानाने आपण लिपोसक्शन व ॲबडॉमीनोप्लास्टी हया दोन्ही शस्त्रक्रिया एकत्रितपणे करुन दोन्हीही शस्त्रक्रियांच्या फायद्यांचा उपभोग घेऊ शकतो.

ॲबडॉमीनोप्लास्टी या शस्त्रक्रियेचे धोके लिपोसक्शन शस्त्रक्रियेने उद्भवणाऱ्या धोक्यांसारखेच आहे. ॲबडॉमीनोप्लास्टीमध्ये जखमा बऱ्या व्हायला वेळ लागू शकतो.

सर्जिकल ड्रेनसारख्या टयूबचा वापर शस्त्रक्रियेदरम्यान करुन साठलेले द्रव पदार्थ २-५ दिवसांत काढून टाकले जातात. कधी कधी हे द्रवपदार्थ काढले तरी पुन्हा साठू शकतात अशा वेळी दवाखान्यात जाऊन डॉक्टरांच्या मदतीने इंजेक्शनद्वारे ते काढता येतात.

या शस्त्रक्रियेचे फायदे त्वरीत दिसून येतात व ६-८ महिन्यांनी व्रण कमी झाल्याने तसेच जखमा सुकल्यामुळे, सूज उतरुन त्वचा पुन्हा मऊ दिसू लागते.

## राहीनोप्लास्टी (Rhinoplasty)



नाकासाठी करण्यात येणारी शस्त्रक्रिया राहीनोप्लास्टी तुमचे व्यक्तिमत्व बदलू किंवा अधिक चांगले बनवू शकते. नाक हा व्यक्तीच्या चेहेऱ्यावरील फार महत्वाचा अवयव असून त्यामुळे चेहेऱ्याला सौंदर्य प्राप्त होते.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

यासारख्या शस्त्रक्रियांचा उपयोग नाकाला योग्य आकार देण्यासाठी, नाकावरील उंचवटा काढण्यासाठी, नाकावरील खड्डा कमी करण्यासाठी, नाकाची लांबी व रुंदी कमी करण्यासाठी, नाकाचा शेंडा वर करण्यासाठी तसेच नाकाचा रुंद शेंडा सुधारण्यासाठी व नाकाच्या हाडाची वेडीवाकडी झालेली वाढ सुधारण्यासाठी केला जातो.

नाकासंबंधी सौंदर्यशस्त्रक्रियेसाठी शक्यतो संपूर्ण भूल दिली जाते परंतु या प्रकारची शस्त्रक्रिया अंशतः भूल देऊनही केली जाऊ शकते. रुग्णाला शक्यतो रात्रभर रुग्णालयात (एक दिवस) ठेऊन दुसऱ्या दिवशी घरी जाण्याची परवानगी देतात. या प्रकारच्या शस्त्रक्रियेनंतर शक्यतो नाकाला सूज येते कधी कधी डोळ्यांभोवती जखमा ही काही आठवडयाच्या कालावधीपर्यंत राहू शकतात. तसेच शस्त्रक्रियेनंतर काही दिवस नाक चोंदण्याचा त्रास होऊ शकतो.

**<u>गाल व हनुवटी वर करण्यासाठीच्या शस्त्रक्रिया (Cheek Augmentation, Chin Augmentation)</u>**



**Fig: Implants positions for cheek and chin and jaw**

सौंदर्यशास्त्रानुसार योग्य संतुलित चेहरा हा सुंदर चेहरा म्हणून ओळखला जातो. चेहऱ्याची लांबी व रुंदी एक विशिष्ट प्रमाणात असते ज्यामुळे चेहरा अधिक आकर्षक व चांगला दिसतो. चेहरा संतुलित राखण्यासाठी गालावर इम्प्लांटस् (Implants) बसविणे फायदेशीर ठरते. इम्प्लांटस् तोंडातील छिद्रातून किंवा पापणीच्या खालून बसविले जातात. हे अशा प्रकारचे इम्प्लांटस् एका दिवसातही बसवता येतात. बऱ्याचशा लोकांना आपल्याला पोक असलेल्या नाकाबरोबर आपली हनुवटी जास्त पुढे किंवा मागे (Over projecting or Under projecting) आल्याची जाणीव नसते.

अशा प्रकारची समस्या कृत्रिम हनुवटी किंवा रीडक्शन ऑस्टीयोटॉमी (reduction osteotomy) द्वारे नीट करता येऊ शकते. याचा फायदा जबडयाची रचना सुधारण्यासाठी ही होतो. या प्रकारच्या शस्त्रक्रियेदरम्यान संसर्ग (intection) व्हायचा धोका असतो. हा संसर्ग प्रतिजैविकांनी (antibiotics) बरा होऊ शकतो. टणकपणा (Hardness) व सूज ही शस्त्रक्रियेनंतर दिसून येते. या समस्या बऱ्या होण्यासाठी ३ महिन्यांचा अवधी लागू शकतो. टणकपणा, इम्प्लान्टस् व्यवस्थित न बसणे, इम्प्लान्टस् काही कारणांनी बदलायला लागणे या सारख्या समस्या शस्त्रक्रियेनंतर उद्भवू शकतात.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

## स्तनवृद्धीसाठीची शस्त्रक्रिया (Breast Augmentation)



स्त्रियांचे स्तन हा स्त्रीसौंदर्याचा महत्वाचा भाग मानला जातो. स्तनांच्या लहान आकारामुळे स्त्रीच्या आत्मविश्वासात व प्रतिष्ठेत कमतरता येऊ शकते. ही शरीरासंबंधीची समस्या असून ही एकतर अनुवंशिक किंवा हार्मोनल (संप्रेरक निगडीत) असू शकते. स्तनांबाबतीत इतर कुठलीही समस्या नसल्याची खात्री करुन अशा प्रकारे स्तनांचा आकार हा स्तन म्प्लांटस् (Breast Implants) वापरुन वाढवता येऊ शकतो.

हे इम्प्लांटस् सिलिकॉन एनव्हलप चे बनलेले असतात. या एनव्हलपमध्ये सलाईन, सिलिकॉन जेल किंवा चिकट सिलिकॉन जेल ने भरलेले असतात. अशा प्रकारचे इम्प्लांटस् बसवण्याआधी तुम्ही या इम्प्लांटस् चे फायदे, तोटे तसेच इतर सर्व माहिती आपल्या सौंदर्यतज्ञाला विचारली पाहिजे. UK इंन्डीपेंन्डंट रीव्हयू ग्रुप (UK Independent Review group) व अमेरीकेतील FDA (फुड ॲण्ड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन) यांच्या सल्ल्यानुसार सिलिकॉन इम्प्लांटस् वापरल्याने मानवी शरीरास कुठलाही अपाय होत नाही.

योग्य आकाराचा सिलिकॉन इम्प्लान्ट छातीच्या स्नायूच्या खालच्या बाजूला किंवा छातीच्या वरच्या पण स्तनपेशींच्या खालच्या बाजूला एक छोटासा छेद करुन बसवला जातो. या प्रकारची शस्त्रक्रिया शक्यतो सौंदर्यतज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करुन दिवसभर किंवा संपूर्ण रात्र रुग्णालयात राहण्याचा सल्ला दिला जातो.

या शस्त्रक्रियेनंतर साधारण लगेचच स्तनांचा आकार वाढलेला दिसून येतो. या शस्त्रक्रियेनंतर स्तनांना सूज येऊ शकते किंवा जखम होऊ शकते पण काही दिवसातच ही सूज व जखम बरी होते. स्तनांचा आकार ६ ते ८ आठवडयांत चांगला वाढतो. संसर्ग (infection), इम्प्लान्ट नीट न बसल्यामुळे काढायला लागणे, रक्त येणे, बधिरता येणे, व्रण टणक होणे यांसारख्या काही समस्या उद्भवू शकतात परंतु यांचे प्रमाण फार कमी आहे.

नामांकित संस्था आधुनिक इम्प्लान्टस् ची हमी (warranty) आयुष्यभराकरता देतात. तरीही सौंदर्यतज्ञाकडून वेळोवेळी तपासणी करुन घेण्याचा सल्ला दिला जातो. पण या इम्प्लान्टस् मुळे जर त्रास होत नसेल तर बदलण्याची आवश्यकता नसते.

## स्तनांचा आकार कमी करण्याची शस्त्रक्रिया (Breast Reduction)



ज्या स्त्रियांच्या स्तनांचा आकार मोठा असतो, पाठदुखी, मानदुखी, खांदेदुखी, बेढब शरीरबांधा व त्यामुळे जाणवणारी आत्मविश्वासाची कमतरता यांसारख्या तक्रारी या स्त्रियांकडून कायम ऐकायला मिळतात. अशा प्रकारे स्तनांचा आकार कमी केल्यास या तक्रारी दूर होऊन शरीरबांधाही चांगला दिसतो.

या प्रकारची शस्त्रक्रिया संपूर्ण भूल देऊन केली जाते. शस्त्रक्रियेनंतर स्तन किती प्रमाणात कमी करायचेत हा अंदाज घेऊन रुग्णास शस्त्रक्रियेनंतर २-५ दिवस रुग्णालयात ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

शस्त्रक्रियेनंतर राहणाऱ्या व्रणानुसार या शस्त्रक्रियेची तीन प्रकारांमध्ये विभागणी केली जाऊ शकते.

१) सर्वसाधारणपणे केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियेमुळे अँकर (anchor) आकाराचा व्रण राहतो.
२) आधुनिक शस्त्रक्रियेमुळे एकच उभा व्रण राहतो.
३) काही शस्त्रक्रियेनंतर व्रण रहात नाही. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेमध्ये लिपोसक्शनचा (liposuction)चा वापर केला जातो. अशा प्रकारची शस्त्रक्रिया काही ठराविक व्यक्तींबाबतच केली जाते.

स्तन कमी करण्याच्या शस्त्रक्रियेमुळे खालील धोके उद्भवू शकतातः

- जखमा लवकर बऱ्या न होणे.
- स्तनाग्र बधिर होणे.
- स्तनाग्रांचा अंशतः किंवा संपूर्ण नाश होणे.
- रक्तस्त्राव.
- संसर्ग होणे

शस्त्रक्रियेनंतर येणारी सूज, जखम, कडकपणा जाण्यास व स्तनांचा आकार नीट होण्यास १२ आठवडयांचा कालावधी लागू शकतो.

*(तारुण्यवृद्धीच्या शस्त्रक्रियांविषयी अधिक जाणून घेण्यासाठी पुढील लेखाचा संदर्भ घ्यावा.)*

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*